



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : १२ वा | शुक्रवार | दि. ०७ फेब्रुवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आमिषांना बळी पडू नका! निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंचे कार्यकर्त्यांना आवाहन...



वृत्तसंस्था/मुंबई

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक आमिषे दाखवली जातील, मात्र तुम्ही त्याला बळी न पडता भक्कमपणे उभे राहून लढा द्या,फ असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षातील पदाधिकाऱ्यांना केले. काहीजण मुंबई लुटायला आले आहेत. पण, मुंबई वाचवण्यासाठी शिवसेना तयार आहे, असे म्हणत त्यांनी शिवसेना आणि भाजपला इशारा दिला. दोन दिवसांपूर्वी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला, त्याच दिवशी संध्याकाळी पक्षाच्या सर्व शाखाप्रमुख आणि उपविभागप्रमुख यांच्याशी उद्धव ठाकरे यांनी ऑनलाइन संवाद साधला. यावेळी शाखाप्रमख तसेच विभागप्रमुखांना मार्गदर्शन करताना अनेक सूचना केल्या. ङ्गगेल्या काही महिन्यांपासून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत ठाकरे गटातील अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला आहे. पदाधिकाऱ्यांनी प्रवेश करावा यासाठी शिवसेनेकडून त्यांना आमिषे दाखवली जात असल्याचा ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा आरोप आहे. हाच धागा पकडत उद्धव ठाकरे बोलत होते. ङ्गकाही जण मुंबई वाचवायला आले असल्याचा आव आणत आहेत. पण मुंबई वाचवण्यासाठी आमची शिवसेना तयार आहे,फ असे त्यांनी या वेळी सांगितले. ङ्गप्रत्येकाने आपला वॉर्ड आणि वॉर्डातील संघटना मजबूत करा. तुम्हाला आणखी आमिषे दाखवली जातील, पण त्याला बळी पडू नका, भक्कम उभे राहा,फ अशा सूचनाही त्यांनी या बैठकीदरम्यान केल्या..दरम्यान, अमरावती येथे गुरुवारी शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या वाहनावर कापूस, सोयाबीन फेकले. ७ फेब्रुवारीपासून शिवसेनेच्या शाखेचे सर्वेक्षण सुरू होणार आहे. त्याअंतर्गत मुंबईतील प्रत्येक शाखेसाठी एक निरीक्षक नेमला जाणार असून ते शाखेत जाऊन पदाधिकारी आणि गटप्रमुख यांच्याकडून शाखा बांधणी बाबतचा आढावा घेणार आहे. शाखेत पदाधकारी कसे काम करतात, शाखेत कोणती आणि किती पदे रिकामी आहेत, याचा संपूर्ण अहवाल हे निरीक्षक उद्धव ठाकरे यांना पुढील आठवड्यात सादर करणार आहेत. आगामी काळात गटप्रमुखांवर मोठ्या प्रमाणावर जबाबदारी देण्यात येणार असल्याचेही समजते.

# विकृतीचा कळस! ४ वर्षीय मुलीवर अत्याचार, नंतर निर्घृणपणे संपवलं अन् पेटीत ठेवलं, सांगली हादरली

वृत्तसंस्था/ सांगली

राज्यात सध्या बालिका आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. बदलापूरसारख्या संतापजनक घटनेतील आरोपीचा एन्काऊंटर होऊनही या घटना काही कमी व्हायचे नाव घेत नाही. अशातच सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील करजगी येथे एका ४ वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेने जत तालुकाच नव्हे तर जिल्हा हादरला आहे. संशयित आरोपी पांडुरंग सोमनिंग कळळी (वय ४५) यास उमदी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुरुवारी सकाळी चिमुकलीची शाळेत जाण्याची वेळ झाली असता कुटुंबीय तिचा शोध घेऊ लागले. आजूबाजूला तिचा शोध घेत असता तिचा काही पत्ता न लागल्याने गावात दवंडी देऊन सुद्धा त्या मुलगी काही सापडली नाही. ही माहिती गावचे पोलीस पाटील व ग्रामस्थांनी उमदी पोलीस स्टेशनला कळवली. पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पत्र्याच्या शेड समोर बदामाच्या झाडाखाली संशयित आरोपी पांडुरंग सोमनिंग कळळी हा दारूच्या नशेत झोपलेला आढळून आला होता. त्या संशयित नराधमाला उमदी पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांना एका पत्र्याच्या घराच मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. घराची झडती घेतली असता घरातील एका पेटीमध्ये पोते दिसले. पोत्यावर डाग असल्याने उघडून पाहिले असता त्यात मुलीचा मृतदेह आढळला. पोलिसांनी



मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जत रुग्णालयात पाठवला आहे. गावकऱ्यांना हा प्रकार समजताच घटनास्थळी एकच गर्दी जमली होती. पोलिसांनी पांडुरंग कळळी-पुजारी याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने बालिकेचा खून केल्याची कबुली दिली आहे. दरम्यान, या घटनेनंतर गावातील नागरिकांकडून संपात व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# माई रमाई: बाबासाहेबांची सावलीच!

## संपादकीय लेख



विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता. ही प्रेरणादायी माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि. अध्यापक यांच्या शब्दांत...

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यंत पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्याप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे दु:खद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

# ती कॉलमच्या खड्ड्यात पडली अन....!

जनसंचलन/बुलढाणा

शहरातील खालिद बिन वलीद नगर मध्ये घराच्या बांधकामासाठी खोदलेल्या कॉलमच्या खड्ड्यात आज एक वगार पडली होती. या वगारीला बांधकाम मजुरांनी सुखरूप बाहेर काढल्यानंतर या वगारने एकच धूम ठोकली. बुलढाणा शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. नवनवीन वस्त्या तयार होत असून मोठ्या प्रमाणात नवीन घरांचे बांधकाम देखील सुरू आहे. आरटीओ ऑफिसच्या पाठीमागील भागात खालीद बिन वलीद नगर मध्ये मस्जिद जवळ सुरू असलेल्या बांधकामाच्या एका कॉलमच्या खड्ड्यात एक वगार आज गुरुवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास पडली होती. दुपारी १ वाजेच्या सुमारास बांधकामासाठी ठेकेदार पोहोचला असता ही बाब त्याच्या लक्षात आल्यानंतर अगोदर दोन-तीन लोकांनी वगारला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला परंतु ते यशस्वी झाले नाही, म्हणून त्यांनी जवळ सुरू असलेल्या बांधकामावरील देऊळघाट येथील कामगारांना ही बाब सांगत मदत मागितली असता



देऊळघाटचे तरुण धावून आले व सगळ्यांनी मिळून दोरीच्या सहाय्याने खड्ड्यात पडलेल्या वगारला सुखरूप बाहेर काढले.ही वगार खड्ड्याच्या बाहेर येताच तिने एकच धूम ठोकली.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ३५ लाखांचं घर २१ लाखांना; एक चूक अन् ठाण्यातील महिलेची मोठी फसवणूक



**ठाणे:** म्हाडाचे ३५ लाखांचे घर २१ लाखांमध्ये देण्याचे प्रलोभन दाखवून, मुंबईतील एका महिलेची सात लाख ६० हजारांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार ठाण्यात समोर आला आहे. याप्रकरणी ठाणेनगर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील एक आरोपी हा म्हाडामध्ये अधिकारी असल्याचे महिलेला सांगण्यात आले होते. ही महिला मूळची चिपळूणची असून, मुंबईतील ओशिवरा येथे भाड्याच्या घरात राहते. तिच्या पतीचे निधन झाले आहे. गेल्यावर्षी एप्रिलमध्ये तिने चिपळूणमध्ये एका राजकीय पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्याची भेट घेतली. माझे स्वतःचे घर नाही. मुलाला काम मिळाल्यास तितकीच मला मदत होईल. घरही घेता येईल. मुलाला अभिनयाची आवड असून, मुलाला काम मिळावे, अशी विनंती महिलेने केल्यानंतर या महिला पदाधिकाऱ्याने तिचे ठाण्यातील एका व्यक्तीशी बोलणे करून दिले. या व्यक्तीला भेटण्याविषयी सांगितले. सुरुवातीला महिलेने त्याला मोबाइलवर संपर्क केला. नंतर त्याची ठाण्यात भेट घेतल्यानंतर त्याने या महिलेला म्हाडाचे ३५ लाखांचे घर २१ लाखांमध्ये घेऊन देण्याचे प्रलोभन दाखवले कमी किमतीत घर मिळत असल्याने ही महिला तयार झाली. त्याने माझ्या ओळखी असून तुमचे घराचे काम माझा एक मित्र करेल, असेही सांगितले. या आरोपीने साहेबांना पैसे देण्यासह विविध कारणांनी सात लाख ६० हजार रुपये उकळले. बनावट कागदपत्रेही दिली. मात्र, म्हाडामध्ये गेल्यानंतर कागदपत्रे बोगस असल्याचे समजले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेच्या तक्रारीनंतर तिघांविरुद्ध मंगळवारी गुन्हा दाखल झाला.

# उद्योगांना त्रास दिल्यास थेट मकोका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पोलिसांना आदेश

**पिंपरी:** पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा परिसर राज्याच्या उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र आहे. मोठ्या प्रमाणावर उद्योग येथे येत असूनही त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी उद्योगांकडून केल्या जातात. उद्योगांना त्रास देणारा कोणत्याही पक्षाचा असला, तरी त्याला सोडू नका. उद्योगांना त्रास देणाऱ्या सर्वांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याच्या (मकोका) माध्यमातून कारवाई करा, असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पोलिसांना दिला. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त कार्यालयाच्या महाळुंगे औद्योगिक पोलिस संकुल व पोलिस विश्रामगृह देहूरोड या इमारतींचे भूमिपूजन फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित गोरखे, आण्णा बनसोडे, महेश लांडगे, शंकर जगताप, विजय शिवतारे, सुनील शेळके, शरद सोनवणे, बाबाजी काळे, बापू पठारे यांच्यासह वरिष्ठ सरकारी अधिकारी या वेळी उपस्थित होते. काही पक्षाचे लोक उद्योगांना त्रास देतात. आमचे असतील, अजित पवार यांचे असतील, एकनाथ शिंदे यांचे असतील; कोणत्याही पक्षाचे असले, तरी ङ्गमकोकाफ्ल कारवाई करावी. महाराष्ट्रामध्ये उद्योगांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या,फ अशी तंबी फडणवीस यांनी दिली. विविध ठिकाणी उद्योगांना त्रास दिला जात असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. राज्यात उद्योजक येत असल्याने, गुंतवणूक वाढत असल्याने उद्योजकांना, उद्योगांना पोषक वातावरण असणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलेपिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या इमारतीचे भूमिपूजनाबरोबरच पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या वेळी अनधिकृत होर्डिंगसाठी महापालिकेने राबविलेली एआय यंत्रणा आणि शहरासाठीची फायर सिस्टीम या दोन्ही उपक्रमांबाबत फडणवीसांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कौतुक केले. जगभरातील कंपन्यांशी संवाद साधला असता त्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक असल्याचे आशादायी चित्र आहे. अशावेळी गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. राज्यात उद्योगांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या.

# ३० वर्षांपूर्वी १०२ कोटींची कमाई, या गाजलेल्या सिनेमाला ने दिलेला चार वेळा नकार...

**मुंबई:** बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान आणि त्याच्यावर अभिनेता शाहरुख खान त्याच्या चाहत्यांचं प्रेम याची तुलना कशाशी करता येणार नाही. शाहरुखनं छोट्या पडद्यावर त्याचं करिअर सुरू केल्यापासून आजपर्यंत त्याला चाहत्यांचं भरपूर प्रेम मिळालं. शाहरुखच्या करिअरमध्ये काही टर्निंग पॉइंट आले ज्यामुळं तो आज किंग खान म्हणून ओळखला जातोय. त्याच्या करिअरमधला एक महत्त्वाचा सिनेमा म्हणजे दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे अर्थात डीडीएलजे. डीडीएलजे हा सिनेमा विसरणं शाहरुखच्या चाहत्यांसाठी केवळ अशक्यच. प्रेमात पडणाऱ्यांसाठी आणि प्रेमात पडलेल्यांसाठी डीडीएलजे हा चित्रपट अत्यंत खास आहे. विशेष म्हणजे, येत्या २० ऑक्टोबरला सिनेमाला तीस वर्षं पूर्ण होतील. शाहरुखच्या करिअरमध्ये या सिनेमाचं खास स्थान आहे. पण



तुम्हाला माहिती आहे की, शाहरुखनं या सिनेमासाठी नकार दिला होता. एकदा,दोनदा नव्हे तर चार वेळा शाहरुखनं डीडीएलजेसाठी नकार कळवला होता.तर सिनेमातल्या राजच्या भूमिकेसाठी तो खूप मोठा आहे, असं शाहरुखला वाटायचं. त्यामुळं त्यानं निर्मात्यांना नकार कळवला होता. पण नंतर झालं असं की त्याची समजूत घालण्याचे अनेक प्रयत्न झाले. दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी अनेक प्रयत्न केल्यानं शाहरुख डीडीएलजेसाठी तयार झाला होता.दरम्यान, असंही म्हटलं जातं की, आदित्य चोप्रा यांना शाहरुखच्या आधीही टॉम क्रूज या सिनेमात राजच्या भूमिकेत बघायची इच्छा होती. इतकंच नाही तर सैफ अली खानला देखील हा सिनेमा ऑफर करण्यात आला होता. पण सैफ अली खाननं देखील या सिनेमाला नकार दिला. त्यानंतर दिग्दर्शक, निर्माते शाहरुखकडे गेले. त्यांनी शाहरुखला सिनेमाची स्क्रिप्ट ऐकवली. पण या भूमिकेसाठी आपण वयानं मोठे आहोत, असं शाहरुखला वाटत होतं. त्यामुळं त्यानं सिनेमाला चार वेळा नकार दिलेला.आज १०० कोटी क्लबची चर्चा होताना दिसते. पण या सिनेमानं ३० वर्षांपूर्वीच १०० कोटी क्लबमध्ये एन्ट्री केली होती. जवळपास ४० लाख रुपये खर्च करून हा सिनेमा बनण्यात आला होता. या सिनेमानं तब्बल १०२ कोटींच्या जवळपास कमाई केली होती.

# ठाकरे गटाला परभणीत मोठा धक्का, तीन जिल्हाप्रमुखांचा राजीनामा

**परभणी :** लोकसभा निवडणुकीत परभणी मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभी राहिले आणि खासदार संजय जाधव यांचा दुसऱ्यांदा विजय झाला. पण त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसह शिवसेनेला मोठी हार सहन करावी लागली. त्यानंतर मात्र शिवसेनेला चांगलीच गळती लागली आहे. एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणी लोकसभा मतदारसंघातील तिन्ही जिल्हाप्रमुखांनी उद्धव ठाकरे याची साथ सोडली आहे. जिल्हाप्रमुख संजय साळगावकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केला तर ए जे बोराडे आणि विशाल कदम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोबत शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासह परभणी लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय जाधव यांना मोठा धक्का मानला जात आहे. मागील २५ वर्षांपासून परभणी लोकसभा मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा झेंडा फडकत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही उद्धव ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती असल्याने परभणी लोकसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा खासदार संजय जाधव यांचा विक्रमी मताधिक्याने विजय झाला. त्यानंतर विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुकलेली व जुनी नेलपॉलिश पुन्हा होईल नव्यासारखी पातळ व चमकदार, फक्त वापरा या सोप्या ट्रिक्स अन् बघा जादू...

स्त्रियांच्या ब्युटी कलेक्शनमध्ये नेलपॉलिशला एक महत्वाचे स्थान असते. विविध रंगांचे आणि प्रकारांचे नेलपॉलिश नखांना सुंदर लुक देण्यासाठी वापरले जातात. मात्र, काही काळ वापर न केल्यास नेलपॉलिश घट्ट होतो, वाळतो किंवा ब्रशला चिकटतो. अशा वेळी बहुतांश लोक तो नेलपॉलिश वाया गेला असे समजून टाकून देतात. पण तुम्हाला माहिती आहे का की हा जुना आणि वाळलेला नेलपॉलिश पुन्हा वापरण्यास योग्य बनवता येतो? याशिवाय, तो केवळ नखांसाठीच नव्हे, तर अनेक घरगुती कामांसाठीही उपयोगी ठरतो.

योग्य ट्रिक्स वापरल्यास तुमचा नेलपॉलिश पुन्हा एकदा पूर्वीसारखा चमकदार बनेल. तसेच, फॅशन आणि घरगुती उपयोगांसाठी तो कसा वापरता येऊ शकतो हे जाणून घेतल्यास तुम्हाला जुन्या नेलपॉलिशचा फायदा मिळू शकतो. चला तर मग, पाहूया अशा ५ उपयुक्त ट्रिक्स ज्या तुमचा जुना नेलपॉलिश नव्यासारखा बनवतील आणि तो फेकण्याची गरज भासणार नाही.

**नेलपॉलिश थीनर वापरा...**





जर तुमचा नेलपॉलिश खूपच घट्ट झाला असेल आणि ब्रशला व्यवस्थित चिकटत नसेल, तर तो पुन्हा मऊ करण्यासाठी नेलपॉलिश थीनर वापरू शकता. फक्त १-२ थेंब नेलपॉलिश रिमूव्हर नेलपॉलिशच्या बाटलीत टाका आणि चांगले हलवा. यामुळे त्याची कन्सिस्टन्सी पुन्हा मऊ होईल आणि सहज लावता येईल. मात्र, जास्त प्रमाणात नेलपॉलिश रिमूव्हर टाकल्यास तो खूप पातळ होऊ शकतो, त्यामुळे योग्य प्रमाण राखणे गरजेचे आहे. जर तुमच्याकडे नेलपॉलिश रिमूव्हर नसेल, तर थोडेसे इथॅनॉल अल्कोहोल किंवा व्हाईट व्हिनेगर देखील वापरू शकता.

**गरम पाणी वापरा**

जर नेलपॉलिश खूप घट्ट झाले असेल आणि तो ब्रशला लागत नसेल, तर तो ५-१० मिनिटे गरम पाण्यात ठेवून पहा. नेलपॉलिशची बाटली गरम पाण्यात ठेवल्यास त्याच्या घट्टपणावर परिणाम होतो आणि तो पुन्हा मऊ होतो. गरम पाण्याच्या उष्णतेमुळे नेलपॉलिशच्या घटकांची साखळी सैल होते आणि रंग गुळगुळीत बनतो. ही पद्धत अगदी सोपी आणि सुरक्षित आहे, कारण यात कोणत्याही केमिकलचा वापर केला जात नाही. तुम्ही ही प्रक्रिया गरम पाणी थोडेसे गार होईपर्यंत करत राहिली, तर अधिक चांगला परिणाम दिसून येईल.

**स्टिम द्या**

नेलपॉलिश फेकून देऊ नका उलट तिला गॅसवर थोडी स्टीम द्या किंवा एखाद्या गरम भांड्यावर धरून ठेवा. घट्ट गोळा झालेली नेलपेंट काही मिनिटांत उष्णतेमुळे वितळेल आणि पुन्हा पातळ होईल.

**उन्हात ठेवा**

नेलपेंट उन्हात ठेवल्यामुळे प्रखर सुर्यप्रकाशामुळे ती आपोआप वितळेल. यासाठी गॅस आणि वेळ दोन्ही वाया घालवण्याची गरज नाही. काही तास नेलपेंटची बॉटल उन्हात ठेवा. काही वेळाने ती पातळ झालेली असेल.

**हवेपासून दूर ठेवा**

नेलपेंट वापरून झाल्यानंतर त्याचे झाकण घट्ट बंद करा आणि ते व्यवस्थित कपाटात ठेवून द्या. शिवाय नेलपेंट लावताना पंख्याची हवा त्याला लागणार नाही याची काळजी घ्या कारण हवेचा भपकारा बसल्याने नेलपेंट लगेच घट्ट होते.

# ओव्हरटेक केल्याचं क्षुल्लक कारण, हेल्मेटने डोक्यावर वार...

## तक्रार करायला पोलीस स्टेशनात गेले अन् तिथेच जीव सोडला

**नवी मुंबई :** भररस्त्यात केवळ आपल्या फक्त गाडी पुढे दुसऱ्या व्यक्तीने गाडी नेली या रागातून एका व्यक्तीची हत्या करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. भररस्त्यात आरोपीकडून एका व्यक्तीला मारहाण झाल्याची ही घटना नवी मुंबईमध्ये घडली आहे. खारघर परिसरातील बेलपाडा ते उत्सव चौक या रस्त्यावर रविवारी रात्री साडेआठ वाजता हा प्रकार घडला. या मारहाणीचा व्हिडिओही समोर आला आहे. या प्रकरणातील हल्लेखोर आरोपी फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव शिवकुमार शर्मा, वय वर्ष ४५, आहे. रविवारी शिवकुमार शर्मा आणि आरोपी हे दोघंही एकाच रस्त्यावरून आपापल्या दुचाकी घेऊन जात होते. आरोपी स्कूटीवर, तर मृत्यू झालेला व्यक्ती दुचाकीवरून पुढे चालला होता. रस्त्यावरुन जात असताना शिवकुमार शर्मा हे आरोपीच्या पुढे गेले, शिवकुमार शर्मा यांनी ओव्हरटेक केलं. त्याचाच राग मनात धरून आरोपीने त्यांच्या दुचाकीचा पाठलाग केला. पुढे सिग्नलजवळ गाडी थांबल्यानंतर दोघांमध्ये भांडण सुरू झालं. काही वेळानंतर हे भांडण विकोपाला गेलं आणि आरोपीने त्याच्या हेल्मेटने शिवकुमार शर्मा यांच्या डोक्यावर वारंवार जोरदार प्रहार केले. हेल्मेटने जोरजोरात मारल्याने ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेमध्येच शिवकुमार शर्मा हे पोलीस ठाण्यात गेले. त्यांनी घडलेल्या घटनेची माहिती खारघर पोलिसांना दिली. पोलीसांनी तक्रार लिहून घेतली. पोलीस तक्रार लिहिण्याच्या अखेरच्या क्षणी शिवकुमार शर्मा हे बेशुद्ध झाले. पोलिसांनी शर्मा यांना तातडीने मेडीसीटी रुग्णालयात दाखल केलं. मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी शर्मा यांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं.दरम्यान, या हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला आहे. खारघर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस सीसीटीव्ही कॅमेराच्या मदतीने आरोपीचा शोध घेत आहेत. भररस्त्यात झालेल्या या मारहाणीनंतर शिवकुमार यांच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून आरोपीला लवकरात लवकर पकडण्यात यावं, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आमिषांना बळी पडू नका! उद्धव ठाकरेंचे कार्यकर्त्यांना आवाहन...

**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक आमिषे दाखवली जातील, मात्र तुम्ही त्याला बळी न पडता भक्कमपणे उभे राहून लढा द्या, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षातील पदाधिकाऱ्यांना केले. काहीजण मुंबई लुटायला आले आहेत. पण, मुंबई वाचवण्यासाठी शिवसेना तयार आहे, असे म्हणत त्यांनी शिवसेना आणि भाजपला इशारा दिला. दोन दिवसांपूर्वी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला, त्याच दिवशी संध्याकाळी पक्षाच्या सर्व शाखाप्रमुख आणि उपविभागप्रमुख यांच्याशी उद्धव ठाकरे यांनी ऑनलाइन संवाद साधला. यावेळी शाखाप्रमख तसेच विभागप्रमुखांना मार्गदर्शन करताना अनेक सूचना केल्या. ङ्गगेल्या काही महिन्यांपासून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत ठाकरे गटातील अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला आहे. पदाधिकाऱ्यांनी प्रवेश करावा यासाठी शिवसेनेकडून त्यांना आमिषे दाखवली जात असल्याचा ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा आरोप आहे. हाच धागा पकडत उद्धव ठाकरे बोलत होते. ङ्गकाही जण मुंबई वाचवायला आले असल्याचा आव आणत आहेत. पण मुंबई वाचवण्यासाठी आमची शिवसेना तयार आहे,फ असे त्यांनी या वेळी सांगितले. ङ्गप्रत्येकाने आपला वॉर्ड आणि वॉर्डातील संघटना मजबूत करा. तुम्हाला आणखी आमिषे दाखवली जातील, पण त्याला बळी पडू नका, भक्कम उभे राहा,फ अशा सूचनाही त्यांनी या बैठकीदरम्यान केल्या..दरम्यान, अमरावती येथे गुरुवारी शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या वाहनावर कापूस, सोयाबीन फेकले. ७ फेब्रुवारीपासून शिवसेनेच्या शाखेचे सर्वेक्षण सुरू होणार आहे. त्याअंतर्गत मुंबईतील प्रत्येक शाखेसाठी एक निरीक्षक नेमला जाणार असून ते शाखेत जाऊन पदाधिकारी आणि गटप्रमुख यांच्याकडून शाखा बांधणी बाबतचा आढावा घेणार आहे. शाखेत पदाधकारी कसे काम करतात, शाखेत कोणती आणि किती पदे रिकामी आहेत, याचा संपूर्ण अहवाल हे निरीक्षक उद्धव ठाकरे यांना पुढील आठवड्यात सादर करणार आहेत. आगामी काळात गटप्रमुखांवर मोठ्या प्रमाणावर जबाबदारी देण्यात येणार असल्याचेही समजते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वर्षा बंगल्याच्या लॉनमध्ये खरंच मंतरलेलं रेड्याचं शिंग पुरलं?

## उपमुख्यमंत्र्यांचा खुलासा काय?



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राउत यांच्याकडून सातत्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जादूटोण्याचे आरोप केले जात आहेत. याआधी संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नाव घेत पहिला निशाणा साधला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी अजून का जात नाहीयत? असा सवाल करत त्यांनी जादूटोण्याचे आरोप केले होते. त्यांच्या आरोपांना शिवसेनेकडून रामदास कदम यांनी प्रत्युत्तर दिलं होतं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा बंगला सोडल्यानंतर वर्षा बंगल्यातून टोपलीभर लिंबू सापडले होते, असा दावा रामदास कदम यांनी केला होता. त्यांच्या या आरोपांना संजय राऊत यांनी प्रत्युत्तर देत अनेक खळबळजनक दावे केले आहेत. वर्षा बंगल्याच्या लॉनमध्ये मंतरलेल्या रेड्याचे शिंग पुरलं आहे, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. वर्षा बंगल्यावर येणारा मुख्यमंत्री जास्त काळ टिकू नये, म्हणून तिथे रेड्याचे शिंग पुरलं आहे, असा दावा राऊतांनी केलाय. त्यांच्या या आरोपांना आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. पण एकनाथ शिंदे यांनी त्यावर फार जास्त बोलणं टाळलं आहे.एकनाथ शिंदे यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पावर एकनाथ शिंदेंनी प्रतिक्रिया दिली. या अर्थसंकल्पावरुन विरोधकांनी केलेल्या आरोपांना देखील शिंदेंनी प्रतिक्रिया दिली. यावेळी एकनाथ शिंदे यांना संजय राऊत यांनी जादूटोणाबाबत केलेल्या आरोपांबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी केवळ दोन ते तीन वाक्यात उत्तर दिलं.त्यांना जादूटोण्याचा खूप जास्त अनुभव आहे. तुम्ही त्यांनाच विचारा. त्यांना जास्त अनुभव असल्यामुळे, मला वाटतं, तुम्ही त्यांनाच विचारा की, खरं काय आणि खोटं काय. यावर बोलण्याची मला आवश्यकता वाटत नाहीङ्ग, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. त्यांच्या या प्रतिक्रियेवर आता संजय राऊत काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# सागर बंगल्यावर रात्री देवेंद्र फडणवीसांसोबत भेट

## भाजप प्रवेशाच्या चर्चांवर एकनाथ खडसे म्हणतात

**मुंबई :** राजकारणातील एकमेकांचे कट्टर शत्रू अशी ओळख राहिलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांची काल रात्री भेट झाली. फडणवीसांच्या सागर बंगल्यावर एकनाथ खडसे मंगळवारी रात्री अचानक पोहोचले. यावेळी दोघांमध्ये तासभर चर्चा झाली. मात्र आम्हा दोघांच्या राजकीय विषयावर गप्पा झाल्या नाहीत, केवळ मतदारसंघातील कामांबाबत बोलणं झालं, असा दावा एकनाथ खडसे यांनी केला आहे. परंतु या भेटीनंतर खडसेंच्या भाजपमधील संभाव्य घरवापसीच्या चर्चांना उधाण आले आहे.




### सागर बंगल्यावर रात्री भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर एकनाथ खडसे मंगळवारी रात्री दाखल झाले. यावेळी इतर नेतेही उपस्थित होते. जवळपास साडेचार वर्षांपूर्वी - ऑक्टोबर २०२० मध्ये भाजपला रामराम ठोकून खडसेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. राष्ट्रवादीत प्रवेश करताना त्यांनी फडणवीसांवर तोफ डागली होती. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतरही खडसे शरद पवारांच्या साथीला राहिले. परंतु दरम्यानच्या काळात ते पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली होती. खडसेंच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त ठरल्याचंही बोललं जात होतं. परंतु हा संभाव्य पक्षप्रवेश लांबणीवर पडताच त्यांनी पुन्हा फडणवीसांवर टीका करायला सुरुवात केली होती. कालच्या भेटीत या वादावर तोडगा निघाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मी मतदारसंघातील विकास कामांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी गेलो होतो. माझ्या मतदारसंघात सहकारी तत्त्वावरील सूतगिरणी आहे, त्याच्या भाग भांडवलाचा विषय होता. मुक्ताबाई मंदिर, अल्पसंख्याकांचे इंजिनिअरिंग कॉलेज लांबले आहे. त्या निवेदनांवर त्यांनी अनुकूल प्रतिसाद दिला, असे खडसे म्हणाले. ही पूर्वनियोजित भेट होती. त्यांच्याकडे वेळ मागितली होती. त्यानुसार एक तास भेटलो, मात्र यावेळी कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. विकासकामांच्या पलिकडे कोणतेही विषय झाले नाही. सध्या भाजप प्रवेशाचा कोणताही विचार नाही, त्या अफवा आहेत, चर्चा निरर्थक आहेत, असे खडसेंनी स्पष्ट केले.



# चॅम्पियन ट्रॉफीमधून जसप्रीत बुमराह बाहेर?

**मुंबई :** पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेमध्ये टीम इंडियाने इंग्लंडचा ४-१ ने पराभव करत मालिका जिंकली. आता तीन वन-डे सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिला वन डे सामना गुरूवारी नागपूर येथे पार पडणार आहे. या मालिकेनंतर चॅम्पियन ट्रॉफी होणार असून त्याआधी एक वाईट बातमी म्हणजे टीम इंडियाचा हुकमी एक्का असलेला जसप्रीत बुमराहच्या खेळण्याबाबत सस्पेन्स आहे. दुखापतीतून त्याला रिकव्हर होण्यासाठी इंग्लंडविरूद्धच्या मालिकेमध्ये घेतलं गेलं नाही. त्याच्या जागी वरूण चक्रवर्तीला टीममध्ये घेतलं गेलं आहे. पण जर बुमराह चॅम्पियन ट्रॉफीसाठी तयार नसेल तर टीम इंडियासाठी मोठा धक्का असणार आहे. जर बुमराह नसेल त्याची जागा कोण घेईल? जसप्रीत बुमराहची जागी भरून काढणं सोप्पं नाही, कारण त्याच्या तोडीचा गोलंदाज नाहीच. टीममध्ये त्याच्या जागी घ्यायचं झालं तर निवडीमध्ये तीन खेळाडू आघाडीवर आहेत. या तीन खेळाडूंमध्ये मुकेश कुमार हा आघाडीवर असू शकतो. मुकेश कुमार याला जास्त अनुभव नाही पण पांढऱ्या चेंडूने आक्रमक मारा करण्याची त्याच्यात क्षमता आहे. महत्त्वाचं म्हणडे डेथ ओव्हर्समध्ये मुकेश दमदार गोलंदाजी करतो. त्यामुळे तो एक मोठा पर्याय उपलब्ध असल्याने त्याचा विचार केला जाऊ शकतोहर्षित राणा या युवा खेळाडूलाही मोठी संधी आहे. इंग्लंडविरुद्धच्या वन डे मालिकेमध्ये त्याची निवड झालेली आहे. राणा प्रभावशाली गोलंदाज असून त्याने चमकदार कामगिरी केली तर निवड समिती त्याचाही विचार करू शकते. राणाच्या गोलंदाजीमध्ये अनेक प्रकारचे चेंडू असून गंभीरने केकेआरमध्ये असताना त्याला जवळून पाहिलं आहे.हर्षित राणानंतर प्रसिद्ध कृष्णा हा आघाडीवर असू शकतो. टीम इंडियासाठी कृष्णाने आतापर्यंत १७ सामने खेळले असून ५.६० च्या इकॉनॉमीसह एकूण २९ विकेट्स घेतल्या आहेत. प्रसिद्धने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्येही दमदार कामगिरी केली होती. निवड समिती नक्कीच त्याचा विचार करू शकते. भारत आणि इंग्लंड तीन वन-डे सामने पहिला वन-डे सामना - ६ फेब्रुवारी - नागपूर दुसरा दुसरा वन-डे सामना - ९ फेब्रुवारी - कटक तिसरा वन-डे सामना - १२ फेब्रुवारी - अहमदाबाद

### चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडिया:

**रोहित शर्मा, शुभमन गिल, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, केएल राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, वॉशिंग्टन सुंदर**

# पुण्यात वाहनांची तोडफोड करणाऱ्या गुंडांचा उतरवला माज, गुडघे टेकवत काढली धिंड...



**पुणे :** पुण्यात गाडी फोडीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. दिवसांगणिक आपली दहशत निर्माण करण्यासाठी गुन्हेगार रस्त्यावरील गाड्यांची तोडफोड करून नुकसान करत आहेत. अशीच एक घटना बिबेवाडीतून समोर आली आहे. दहशत निर्माण करण्यासाठी गाड्या फोडणाऱ्या आरोपीची त्याच ठिकाणाहून धिंड काढून पोलिसांनी माज उतरवला आहे. याचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहेत. गुडघे टेकवत पोलिसांनी ही धिंड काढली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री बिबवेवाडी परिसरात असणाऱ्या भागात ४० हुन अधिक वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली होती. आरोपींनी काहीही कारण नसताना गाड्यांची तोडफोड केली. दहशत माजवण्यासाठी ही तोडफोड करण्यात आली होती. पोलिसांनी या प्रकरणी अंडी उर्फ निरंजन देवकर ,अभिषेक पांढरे, गणराज सुनील ठाकर या तीन आरोपींना अटक केली. त्यानंतर पोलिसांनी यांना चांगलीच अद्दल घडवली. पोलिसांनी गुंडाची दहशत मोडून काढण्यासाठी व त्यांना धडा शिकवण्यासाठी धिंड काढली आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरांमध्ये गुन्हेगारीने मोठ्या प्रमाणात डोकेवर काढले आहे. आपले अस्तित्व टिकवण्यासाठी स्थानिक गुंड वाहनांची तोडफोड करत आहेत. खून, दरोडे, चोरी, बलात्कार यासारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना पाहायला मिळत आहे. या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी पुणे पोलीस ॲक्शन मोडवर आलेले पाहायला मिळत आहेत.

त्यातच बिबवेवाडीमध्ये गुंडांनी केलेली वाहनांची तोडफोड ही दहशत पसरवण्यासाठी केली असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना अद्दल घडवण्यासाठी खाकी दाखवत त्यांची परिसरातून धिंड काढली. पुण्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांनी वेगवेगळी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे कौतुक करण्यात येत आहे. अशी कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना कुठल्याही प्रकारे सोडणार नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. आता आरोपींच्या धिंडचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत

# उद्धवजी येईपर्यंत तरी थांबा ना, ठाकरे गटाच्या नेत्यांची नाराजांना विनवणी....

**पुणे :** शिवसेनेत फूट पडल्यानंतर दोन्ही गटांची ताकद विभागली गेली. त्यात आता तुटपुंजी ताकद उरलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला आणखी मोठे धक्के बसायला सुरुवात झाली आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यात ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांनी जय महाराष्ट्र करत भाजपचा झेंडा हाती घेतला. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या सेनेचा कणा असलेले दोन माजी आमदार देखील ठाकरेंची साथ सोडणार असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे. आधीच ताकद कमी, त्यात महापालिका निवडणुकीच्या तोंडावर बसणारे धक्के लक्षात घेता बाळासाहेब ठाकरे यांचं आवडतं शहर असलेल्या पुण्यात शिवसेना (उबाठा) पक्षाला वाचवण्यासाठी स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता मैदानात उतरणार आहेत. उद्धव ठाकरे हे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात पुणे दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यामध्ये ते शिवसेनेच्या (उबाठा) काही मोजक्या शाखांना



भेट देणार आहेत. पुण्यात शिवसेनेच्या (उबाठा) २१ शाखा आहेत. या २१ शाखांपैकी काही शाखांना उद्धव ठाकरे भेट देणार आहेत. या भेटीनंतर ते पुण्यातील सर्व शाखा प्रमुखांची एक संयुक्त बैठक घेतील. या बैठकीनंतर त्यांना संबोधित देखील करणार आहेत. त्यापूर्वीच ठाकरे गटातील काही पदाधिकारी पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या या दौऱ्यापूर्वी ठाकरे गटाची एक बैठक पार पडली आणि या बैठकीत ङ्कङ्कउद्धव ठाकरे येणार आहेत तोपर्यंत थांबाङ्कङ्क असं नाराज पदाधिकाऱ्यांना सांगितल्याची माहिती आहे. त्यामुळे ठाकरे गटाला लागलेली गळती पाहता उद्धव ठाकरे यांचा हा संभाव्य दौरा पुण्यातील पक्ष गळती रोखण्यास यशस्वी ठरणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एकीकडे भाजप, आणि आता दुसरीकडून एकनाथ शिंदेंची सेनाही ठाकरेंच्या पक्षांमध्ये नाराज असलेल्या नेत्यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. शिंदेंच्या शिवसेनेने तर मिशन टायगर राबवत ठाकरेंना अनेक धक्के देण्यास सुरुवात केली आहे.आधीच तुटपुंजी असलेली पुण्यातील ठाकरे सेनेची ताकद आणखी कमी होत असल्याने आगामी महापालिका निवडणुकीसाठी ही धोक्याची घंटा होऊ शकते. त्यामुळे स्थानिक पदाधिकारी या नाराजांना रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र नाराज नेत्यांची नाराजी दूर करण्यात कुठेतरी स्थानिक पदाधिकारी कमी पडत असल्याने नुकतंच काही स्थानिक नेत्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेत पुण्यामध्ये येण्याची विनंती केली होती. त्यानुसार आता फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात उद्धव ठाकरे हे पुण्यामध्ये येऊन शाखाप्रमुख यांना भेटणार आहेत.

# भारताच्या विजयानंतरही विराट कोहलीला बसला मोठा धक्का...



**नागपूर :** भारताने पहिल्या वनडे सामन्यात इंग्लंडवर दणदणीत विजय साकारला. नागपूरच्या मैदानात भारताने इंग्लंडचा धुव्वा उडवला. भारतीय चाहत्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. पण भारताच्या विजयानंतरही विराट कोहलीसाठी एक बॅड न्यूज आली आहे. भारताचा पहिल्या वनडेसाठी जेव्हा संघ जाहीर केला, तेव्हा सर्वांनाच धक्का बसला होता. कारण विराट कोहलीचे नाव भारताच्या संघात नव्हते. त्यानंतर विराट कोहलीच्या गुडघ्याला दुखापत झाली असल्याचे सांगितले गेले. या दुखापतीमुळे विराट कोहलीला पहिला सामना खेळता आला नाही. विराट कोहली पहिल्या वनडे सामन्यात खेळणार नसल्याचे समोर आले आणि त्याच्या जागी श्रेयस अय्यरला भारताच्या संघात संधी देण्यात आली. विराट कोहली ज्या चौथ्या स्थानावर फलंदाजीला उतरतो, त्या स्थानावरच श्रेयस अय्यरला फलंदाजीसाठी पाठवण्यात आले.विराट कोहलीला पहिला सामना दुखापतीमुळे खेळता आला नाही. पण आता त्याला दुसऱ्या सामन्यातही संधी मिळेल की नाही, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघात फॉर्म आणि फिटनेस सर्वात महत्वाचा आहे. विराट कोहलीला दुखापत झाली होती, पण तो फिट होईल. पण फॉर्मचे काय, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण विराट सध्याच्या घडीला वाईट फॉर्मात आहे. विराटच्या जागी आलेला श्रेयस अय्यर दमदार फलंदाजी करून गेला. त्यामुळे श्रेयस अय्यरऐवजी विराट कोहलीला का संधी द्यावी, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यामुळे दुसऱ्या वनडे सामन्यातही विराट कोहलीला संधी मिळणार नसल्याचे आता समोर येतत असून हीच त्याच्यासाठी वाईट बातमी आहे. कारण पुढच्या सामन्यात विराटला संघात घेताना श्रेयसला संघाबाहेर करण्याचे कारण काय सांगायचे, हा सर्वात मोठा प्रश्न भारतीय संघ व्यवस्थापनापुढे असणार आहे. विराट कोहली सध्या वाईट फॉर्मात आहेत. त्यामध्येच त्याला दुखापत झाली आहे. पहिली वनडे तो खेळू शकला नाही आणि त्यामध्येच दुसऱ्या वनडेतही आता संधी मिळेल, असे दिसत नसल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

# पेनटाकळी जलाशयात महिलांसह नागरिकांचे आमरण उपोषणास सुरुवात...

**जनसंचलन/मेहकर**

मेहकर तालुक्यातील मौजे पेनटाकळी येथील नागरिकांनी ३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना एका निवेदनाद्वारे पेन टाकळी येथील गावठाणचे स्थलांतर करण्याकरिता सात दिवसांच्या अवधी दिला होता. परंतु संबंधित कालावधीमध्ये जिल्हा प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याने अखेरीस ६ फेब्रुवारीपासून पेनटाकळी येथील महिला व नागरिकांनी पेनटाकळी जलाशयात आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. या जलाशयामध्ये सुमन लहाने,शांताबाई मते, भागुबाई अंभोरे, मंगलाबाई इंगळे,शोभा मगर,जयश्री राऊत,संगीता मोरे, द्वारकाबाई वाघ, कुसुमबाई मगर,मंदा इंगळे,मंदाबाई विश्वनाथ वाघ, द्रौपदी बाई काकडे, सुनंदाबाई निकम, कौशल्याबाई धंदरे, मयुराबाई गायकवाड, सरस्वती इंगळे, मणकर्णा इंगळे,केशरबाई इंगळे, शांताबाई इंगळे,अनुराधा बाई डुकरे,शितल इंगळे, दुर्गा अंभोरे,दीक्षा वानखेडे,अलका गवई, सुशीला वानखेडे,लता वानखेडे,ज्योती वानखेडे, शकीलाबाई वानखेडे,रमा वानखेडे,उषा गवई,मीना वानखेडे,वैशाली वानखेडे,रत्नमाला वानखेडे,नर्मदा वानखेडे, गुंफाबाई वानखेडे, अन्नपूर्णा वानखेडे,सीमा वानखेडे,शीला खरात, निर्मला गायकवाड, कांताबाई कांबळे,मीरा राजेकर,मनीषा काकडे, लक्ष्मीबाई काकडे,गीता काकडे आदी महिलांसह मधुकर खरात,शत्रुघ्न वानखेडे, मधुकर इंगळे,दीपक काकडे,भगवान वानखेडे, रामदास वानखेडे,संजय वानखेडे,बाळू वानखेडे, गजानन वानखेडे,प्रकाश कांबळे,जगदीश इंगळे, परसराम इंगळे,गजानन वाघ,आनंद वानखेडे दत्तात्रय इंगळे,दगडू गवई, संतोष खरात,अमोल डुकरे,सदाशिव काकडे, दत्तात्रय धोंडगे,सुरेश इंगळे,पुरुषोत्तम माळेकर, शिवाजी वानखेडे, पुंजाजी इंगळे,शंकर इंगळे,मंगेश इंगळे, विश्वासराव इंगळे,किसन मोरे,भागवत जाधव, गजानन इंगळे,त्र्यंबक इंगळे,सर्जेराव इंगळे, गुलाबी इंगळे,संतोष डुकरे,भीमराव वानखेडे, भीमराव काकडे,अक्षय इंगळे,शांताबाई राऊत, संजय अंभोरे,रवींद्र इंगळे,धोंडीराम ठोंबरे, वैभव इंगळे,गोपाल इंगळे पंजाबराव इंगळे,पुंडलिक खरात,परमेश्वर वानखेडे, प्रवीण इंगळे,शिवप्रसाद जाधव,केशवराव इंगळे, पंढरी इंगळे,मधुकर धोंडगे,तेजराव राजेकर, अशोक सुरवसे,जयराम केवट,नारायण जाधव, महादू वानखेडे,विजय



मते,विकास गायकवाड, किसन इंगळे,प्रतिभा इंगळे,पार्वती खरात आदींनी आमरण उपोषास सुरवात केली असून, उपोषणाच्या पहिल्याच दिवशी सामाजिक कार्यकर्त्या तथा सप्तशृंगी महिला अर्बन बँकेच्या अध्यक्षा कु माधुरी देवानंद पवार यांनी सदरहू उपोषणास तातडीने भेट देऊन गावकऱ्यांनी केलेली मागणी रास्त असल्याचे सांगत मौजे पेनटाकळी येथे तब्बल ३८० घरांचे स्थलांतर करणे क्रम प्राप्त आहे. तसेच सदर ठिकाणी संपूर्ण बाबींची परिपूर्णता असूनही अद्याप पर्यंत शासनाच्या अधिकाऱ्यांनी याकडे का दुर्लक्ष केले? ही बाब अनाकलनीय असून, शासनाच्या अधिकाऱ्यांनी ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे सांगत पेनटाकळी वासीयांची मागणी अतिशय रास्त असल्यामुळे मी व माझा संपूर्ण सप्तशृंगी महिला अर्बन परिवार पेनटाकळी वासीयांच्या मागे ठामपणे उभे राहू अशी प्रतिक्रिया यावेळी कु.माधुरी पवार यांनी दिली.

# जळगांव जामोद आणि सोनाळा येथे जबरी चोरी प्रकरणाचा पर्दाफाश!

**जनसंचलन/ जळगांव जामोद**



जिल्ह्यातील जबरी चोरीच्या घटनांवर पोलिसांनी धडक कारवाई करत मोठे यश मिळवले आहे. जळगांव जामोद येथे झालेल्या जबरी चोरीच्या प्रकरणाचा तपास करून स्थानिक गुन्हे शाखेने एक आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून १,१३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ०८ डिसेंबर २०२४ रोजी जळगांव जामोद येथे शेतात जात असलेल्या महिलेवर हल्ला करून तिच्या गळ्यातील १८,००० रुपयांचे सोन्याचे दागिने आणि मोबाईल जबरदस्तीने पळवून नेण्यात आले होते. पोलिसांच्या तपासात आरोपी काझी मझहरोद्दिन झुबेरोद्दीन (रा. राणीपार्क, जळगांव जामोद) याचा समावेश निष्पन्न झाला. त्याच्याकडून सोन्याचे दागिने, मोबाईल आणि ६०,००० रुपयांची मोटारसायकल जप्त करण्यात आली. अटक केलेल्या आरोपीने सोनाळा येथे केलेल्या जबरी चोरीची कबुली दिली असून, त्याच्याकडून इतर गुन्ह्यांची चौकशी सुरू आहे. पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अशोक लांडे आणि त्यांच्या पथकाने ही मोठी कामगिरी केली. या पथकाने फक्त चार दिवसांत गुन्ह्याची उकल करत आरोपीला गजाआड केले. आरोपीला पोलीस कोठडीत ठेवून इतर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. बुलढाणा पोलिसांच्या या जलद आणि प्रभावी कारवाईने गुन्हेगारांना धडा मिळाला आहे.

# मित्रा-मित्रातील वाद पोहचला पोलीस ठाण्यात!

**जनसंचलन/ चिखली**




आजकालच्या मुलांना पटकन राग येतो.या ना त्या कारणाने मारामाऱ्या करतात. चिखली शहरात ४ फेब्रुवारीला दोन मित्रांनी एकाला आदल्या दिवशी मफलरचा फटका मारला हा वाद मिटला होता परंतु दुसऱ्या दिवशी हातावर चाकू मारल्याने प्रकरण पोलीस ठाण्यात गेले. पोलीस तक्रारीनुसार, चिखली येथील गौरव सुधाकर वायाळ हा गजानन महाराज मंदिर समोरून घरी जात असताना आसाम चौकात त्याचे मित्र प्रथमेश केळोदे व साहिल शिंगणे हे उभे होते.दरम्यान साहिल शिंगणे याने त्याच्या गळ्यातील मफलर काढून मजाक मध्ये मफलरचा फटका गौरवच्या डोळ्यावर मारला.त्यामुळे तिघांची बाचाबाची सुरू झाली.परंतु सुमित गायकवाड वअजय डोंगरदिवे या मित्रांनी हा वाद मिटवला.दरम्यान ४ फेब्रुवारीच्या रात्री गौरव नालंदा चौकात मित्रांना भेटण्यासाठी गेला असता,प्रथमेश किलोदेव साहिल शिंगणे यांनी शिवीगाळ करून पुन्हा वाद घातला.यावेळी प्रथमेश केळोदे यांनी गौरवला पकडून ठेवले आणि साहिल शिंगणे याने खिशातील चाकू काढून गौरव च्या हाताच्या ढोपरावर वार केल्यामुळे गौरवला पंधरा टाके पडले आहेत.याप्रकरणी गौरवने पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

# महिलेला मारहाण केली अन् गळ्यातील सोन्याची पोथ घेऊन पळाला!

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जळगाव जामोद व सोनाळा येथील जबरी चोरीच्या गुन्ह्याची यशस्वी उकल करून, तब्बल १,१३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत एका अट्टल चोरट्याला बेड्या ठोकल्यात. काझी मजहरोद्दीन झुबेरोद्दीन ३६ रा.राणी पार्क जळगाव जामोद असे या आरोपीचे नाव आहे. हकीकत कशी आहे की,फिर्यादी शालू धम्मपाल दामोदर रा.खेडा खुर्द तालुका जळगाव जामोद ह्या ८ डिसेंबर २०२४ रोजी शेतात जात असताना, आरोपीने त्यांचा रस्ता अडविला आणि मारहाण करून जबरदस्तीनेत्यांच्या गळ्यातील तीन ग्रॅम सोन्याचे मनी असलेली पोथ व मोबाईल घेऊन पोबारा केला होता. इतरांकडून देखील चार ग्रॅम सोन्याची पोत जबरीने चोरून नेली होती.या



प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वातील पथकाने सदर चोरट्याला जेरबंद केले आहे. चोरट्या कडून सोन्याचे मणी व ईतर वजन ६.९६० ग्रॅम किं. ४२,०००,एक मोटार सायकल ६०,०००, दोन मोबाईल असा एकूण १,१३,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सपोनि. रुपेश शक्करगे, पोहेकॉ. दिपक लेकुरवाळे, गणेश पाटील, चाँद शेख, पोकॉ. गोपाल तारुळकर चालक पोकॉ. पुंड स्था.गु.शा. बुलढाणा व पोहेकॉ. राजू आडवे, पोकॉ. ऋषीकेश खंडेराव तांत्रिक विश्लेषण विभाग बुलढाणा यांनी केली.

# छत्रपती शिवरायांबद्दलच्या आक्षेपार्ह विधानाचा बुलढाणा शिवजयंती समितीकडून निषेध!

## राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा गुन्हा दाखल करण्याची मागणी!



जनसंचलन/बुलढाणा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आजोळी, राजमाता जिजाऊ माँ साहेबांच्या मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात.. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणाच्या वतीने आक्षेपार्ह विधान करणाऱ्या राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येऊन, मा. मुख्यमंत्री यांच्यासाठी मा. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सोलापूरकर यांच्या निषेधाचे निवेदन देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणाचे अध्यक्ष राजेंद्र काळे यांच्यासह समितीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे निवेदन सादर केले. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी मनाची अस्मिता असून, त्यांच्या आग्रा सुटकेबद्दल अतिशय चुकीचे विधान विकृत पद्धतीने अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केले आहे. या विधानामुळे तमाम मराठी शिवप्रेमींच्या भावनांना हादरा बसला आहे. विशेष म्हणजे एका यूट्यूब चैनलला ही मुलाखत घेणाऱ्या रीमा अमरापूरकर या सोलापूरकर यांच्या विधानावर ज्या पद्धतीने हसून आश्चर्य व्यक्त करत होत्या, ती पद्धतही अतिशय विकृत वाटली.. त्यांच्यावरही कारवाई करून सोलापूरकर यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.. त्यासाठी बुलढाणा शहरातील तमाम शिवप्रेमींतर्फे हे विनम्र निवेदन देत असल्याचे यात नमूद करण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील तमाम महापुरुषांबद्दल चुकीची विधाने करण्याची विकृती अलीकडे वाढत असून, त्याला पायबंद घालण्यासाठी एखादा कठोर कायदा करण्यात यावा, अशी विनंती मा. मुख्यमंत्र्यांना छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक उत्सव समिती बुलढाणा यांच्यावतीने यावेळी निवेदनातून करण्यात आली. सदर निवेदन देताना अध्यक्ष राजेंद्र काळे, सचिव उमेश शर्मा, माजी अध्यक्ष ॲड. जयसिंगराजे देशमुख, कोषाध्यक्ष अरविंद होंडे, सांस्कृतिक अध्यक्ष शैलेश खेडकर, गोपालसिंग राजपूत, मोहन पऱ्हाड, संजय बी. गायकवाड, पवन भालेराव, पप्पू देशलहरा, आशिष चौबे, दिगंबर अंभोरे, आकाश दळवी, डी.एस. चव्हाण आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# सह दुय्यम निबंधकपदी लिपिकाच्या नेमणुकीला मनाई!

## दस्त नोंदणीचे काम ठप्प होण्याची शक्यता?

जनसंचलन/बुलढाणा

नोंदणी विभागातील सह दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक अशा जबाबदार पदांच्या रिक्तजागेवर खात्यातील वरिष्ठ वा कनिष्ठ लिपिकांच्या नेमणुका करू नयेत, असे आदेश राज्य शासनाने बुधवारी (दि.५) जारी केले. त्यामुळे बुलढाणा शहराबरोबरच राज्यातील अनेक उप निबंधक कार्यालयातील नोंदणीचे काम ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नोंदणी विभागात सह दुय्यम निबंधक वर्ग-२, सह जिल्हा निबंधक वर्ग-२ आणि मुद्रांक उप अधिक्षक या संवर्गात २६० पदे मंजूर आहेत. त्यापैकी तब्बल ८५ पदे रिक्त आहेत.त्यामुळे नोंदणीची कामे खोळंबू नयेत या उद्देशाने या रिक्त पदांवर वरिष्ठ वा कनिष्ठ लिपिकांची नेमणूक करण्यात येत असे. त्याखेरीज रजेवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जागीही प्रतिनियुक्तीवर लिपिकांना पाठविण्यात येत असे. तथापि, शासनाच्या महसूल व वन विभागाचे



कार्यासन अधिकारी सुनील जाधव यांनी बुधवारी जारी केलेल्या एका परिपत्रकाने अशा नेमणुकांवर बंदी घातली आहे. त्यामुळे राज्यातील ८५ दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.


पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४